जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

**प्रेसनोट क्रमांक - २२४ दिनांक १९/०३/२०२१**

# बिबवेवाडी पोलीस स्टेशन पुणे शहर
## युवका कडुन पिस्टल व जिवंत काडतुस असा एकुण ५२,०००/- रुपयाचा माल केला हस्तगत

दि.१८/०३/२०२१ रोजी मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सुनील झावरे आदेशान्वे पोलीस ठाणेकडील तपास पथकातील प्रभारी अधिकारी सहा. पोलीस निरीक्षक, श्री. उसगांवकर, पोलीस हवालदार शामराव लोहोमकर, पोलीस शिपाई अमित पुजारी, दिपक लोधा,सतिष मोरे, श्रीकांत कुलकर्णी, अमोल शितोळे, तानाजी सागर असे रात्रौ २०.०० वा चे सुमारास पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना पोलीस शिपाई पुजारी यांना त्यांच्या बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, एक इसम कुंभारवाडा समोरील वॉशिंग सेंटर समोर उभा असुन त्याचे कंबरेला काहीतरी संशयीत खोचलेले दिसत आहे. वगैरे आशयाची बातमी प्राप्त झाल्याने सदर बाबत वरिष्ठांना कळवुन कारवाईचे आदेश प्राप्त करुन सहा.पोलीस निरीक्षक श्री उसगावकर यांनी स्टाफसह कुंभारवाडा बिबवेवाडी येथील वॉशिंग सेंटर समोर जावुन बातमी प्रमाणे उभा असलेला संशयीत इसम दिसल्याने त्यास ताब्यात घेवुन कार्यवाही करणे असल्याने सहा.पोलीस निरीक्षक श्री उसगावकर यांनी स्टाफसह नियोजित पुर्व सापळा रचुन त्याचे दिशेने जात असताना त्यास पोलीसांचा संशय आल्याने तो शिवशंकर सोसायटीचे दिशेने पळुन जात असताना त्यास थोड्याच अंतरावर पकडुन त्यास त्याचे नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव अनिकेत राजू वसवे, वय २१ वर्षे, रा. सनं. ६५९, राजीव गांधी नगर, अप्पर बिबवेवाडी, पुणे मुळगाव वसवेवाडी, ता. हवेली जि. पुणे असल्याचे सांगितले सहा.पोलीस निरीक्षक श्री उसगावकर यांनी बातमी प्रमाणे त्याची अंगझडती घेतली असता त्याचे पँटचे डावे बाजुला शर्टचे आतील बाजूस कंबरेमध्ये एक देशी बनावटीचे मॅगझीन असलेले पिस्टल (अग्निशस्त्र) व पँटचे खिश्यामध्ये ०२ जिवंत पिवळया धातुचे काडतुसे असा एकुण ५२,०००/- रुपयेचा माल बेकायदेशिर रित्या त्याच्या कब्जात मिळुन आल्याने त्याचे विरुध्द बिबवेवाडी पोलीस ठाणेस भारतीय हत्यार कायदा कलम ३ (२५) सह महाराष्ट्र पोलीस अधिनीयम कलम ३७ (१) (३) सह १३५ प्रमाणे बिबवेवाडी पोलीस ठाणेकडील पोलीस शिपाई दिपक लोधा यांनी कायदेशिर फिर्याद दिल्याने त्याच्या विरुध्द गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. पुढील तपास सहा.पोलीस निरीक्षक श्री राजेश उसगावकर हे करीत आहे.

सदरची कामगिरी श्री नामदेव चव्हाण अपर पोलीस आयुक्त सो,पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्रीमती नम्रता पाटील,पोलीस उप आयुक्त सो,परिमंडळ-०५,पुणे शहर श्री राजेंद्र गलांडे, सहा.पोलीस आयुक्त सो, वानवडी विभाग,पुणे शहर यांच्या मार्गदर्शना नुसार श्री सुनील झावरे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक बिबवेवाडी पोलीस ठाणे, श्रीमती अनिता हिवरकर,पोलीस निरीक्षक (गुन्हे),बिबवेवाडी पोलीस ठाणे पुणे शहर यांच्या सुचने प्रमाणे तपास पथकातील प्रभारी अधिकारी श्री राजेश उसगावकर, सहा.पोलीस निरीक्षक, पोलीस शिपाई अमित पुजारी, दिपक लोधा,सतिष मोरे, श्रीकांत कुलकर्णी, अमोल शितोळे, तानाजी सागर यांनी केली आहे.


वाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर
तपास पथक